**शपथेवर उलटतपास सुरु...**

**उलटतपास – विधिज्ञ श्री एस.एस. मुतालिक जाबदारतर्फे**

८. माझे शिक्षण ९वी पर्यत झाले आहे माझे नियुक्तीबाबत कोणताही कागद मी याकामी दाखल केलेला नाही. जाबदार कारखाना साखरेचे उत्पादन करतो व त्यामध्ये विविध विभाग आहेत. मी नोकरीत लागलेपासून फिटर–ए या पदावर सेंट्री फ्युगल या इंजिनिअरींग विभागात जाबदाराकडे काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी जाबदाराविरुध्द उपदान मागणीकरिता कामगार न्यायालयात दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या दाव्याच्या निर्णयानुसार मला उपदानाची रक्कम प्राप्त झाली आहे. उपदान प्रदान मागणीकरिता दाखल केलेला दाव्याचा तपशिल या केसकामी नमूद नाही व त्यातील कोणतेही कागद याकामी दाखल केलेले नाहीत.

९. जाबदाराकडे पूर्वीपासून श्रमिक संघटना कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे साखर कामगार संघ (इंटक) ही संघटना प्रातिनिधिक स्वरुपात जाबदार कारखान्याकडे कार्यरत आहे. मी त्या संघटनेचा सभासद सुरुवातीपासून होतो. हे म्हणणे खरे आहे की कामगारांच्या सेवाशर्थीबाबत सदर संघटनेबरोबर जाबदार कारखाना हे चर्चा व करार करीत आलेले आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की सदर संघटना त्याबाबत आम्हांला कोणतीही कल्पना देत नव्हती. मी सदर संघटनेकडे माहिती मागण्याकरिता कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच संघटनेकडून मला कोणतीही माहिती मिळत नसलेबाबत जाबदाराकडे कोणतीही तक्रार केलेली नाही. संघटनेबरोबर झालेल्या कराराचे फायदे मी वेळोवेळी सभासद म्हणून स्वीकारलेले आहेत.

विधिज्ञ श्री मुतालिक यांच्या विनंतीवरुन उलटतपास तहकूब...

Sd/–
(दि.मा. पाटील)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सांगली

सांगली.

दिनांक – १५/०७/२०२४.

--/--